MHAH250005542024

**नियमीत दिवाणी दावा क्र.१९३/२०२४**

**ममताजी टेकुडे व इ. वि. भाऊ भोर व इ.**

**निशाणी १८ वरील आदेश**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर २६ रुल ९ अन्वये उपअधिक्षक भुमी अभिलेख पारनेर यांची दावा मिळकतीची मोजणी करणेकामी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादींनी सदरचा दावा हा प्रतिवादी यांच्या जाहीर ठराव होऊन मिळण्यासाठी तसेच पोकळीस्त नोंदीचे अधारे प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी दावा मिळकतीत अनाधिकाराने येऊ नये, अतिक्रमण करु नये, कोणत्याही प्रकारे बांधकाम करु नये तसेच वादी यांच्या दावा मिळकतीवर असणा–या वहिवाटीस व उपभोगास हिल्ला हरकत अडथळा करु नये असा निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळणेसाठी व इतर दादीसाठी दाखल केलेला आहे.

३. वादींच्या अर्जातील कथन की, दावा मिळकत ही वादी यांच्या वडिलोपार्जित मालकीची वारसा हक्काने आलेली अशी मिळकत असुन ती वादी यांच्या कब्जात व ताब्यात आहे. दावा मिळकतीशी प्रतिवादी नं.१ ते ४ यांचा कोणताही संबध नाही. वादी यांनी दावा मिळकतीची दि.२८/०१/२००२ रोजी मो.र.नं.५०३ अन्वये मोजणी करुन दावा मिळकतीच्या हद्यी खुना निश्चित करुन घेतलेल्या आहेत. प्रतिवादी नं.१ ते ४ यांचा दावा मिळकतीशी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही मात्र प्रतिवादी नं.१ ते ४ हे बळाचा वापर करुन अनाधिकाराने वादी यांच्या दावा मिळकतीत असणा–या क्षेत्राच्या वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत.

४. वादींच्या अर्जातील पुढे कथन की, यापुर्वी देखील वादींनी प्रतिवादीविरुध्द निरंतर मनाई हुकुम मिळण्याकरीता २००२ साली दावा दाखल केला होता. परंतु सदर दावा तांत्रीक कारणामुळे खारीज करण्यात आला. सदर निकाला विरुध्द वादींनी मा.जिल्हा न्यायालय येथे अपील दाखल केले होते. सदर अपील देखील खारीज करण्यात आले आहे. सदर निकालाचा गैरवापर करुन प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी दावा मिळकतीला स्वतःचे नाव लाऊन घेतले आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावे झालेली नोंद ही गैरकायदेशीर आहे.

त्यामुळे त्याबाबत वादींनी जाहीर ठरावाची मागणी केली आहे.

५. वादींच्या अर्जातील पुढे कथन की, सदर नोंदीचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी नं.१ ते ४ हे वादी यांच्या दावा मिळकतीच्या उत्तर पुर्व कोप–यात अनाधिकाराने अतिक्रमण करुन घुसु पाहत आहेत. तसा प्रयत्न प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी तारीख १२/०२/२०२४ रोजी केला असता वादी यांनी त्यास हरकत घेतली असता प्रतिवादी नं.१ ते ४ तसेच त्यांची मुले यांनी दावा मिळकतीत येऊन आम्ही दावा मिळकतीचा ताबा घेणारच आहे, आम्ही सदर मिळकतीचे कोर्टाच्या आदेशाने मालक झालो आहोत असे म्हणुन दावा मिळकतीत अनाधिकाराने घुसण्याचा प्रयत्न केला. मात्र तो प्रयत्न यशस्वी झाला नाही. प्रतिवादी नं.१ ते ४ यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसतांनाही प्रतिवादी नं.१ ते ४ हे ग्रामपंचायत रेकॉर्डला लाऊन घेतलेल्या चुकीच्या नोंदीच्या आधारे दावा मिळकतीत अनाधिकाराने घुसु पाहत आहेत. त्यामुळे दावा मिळकतीची उपअधिक्षक भुमी अभिलेख, पारनेर यांच्या मार्फत मोजणी होऊन वादी यांच्या दावा मिळकतीच्या हद्दी खुना निश्चित होणे आवश्यक आहे. सदर मोजणी झाल्यास वादी यांच्या दावा मिळकतीचे निश्चित असे अवलोकन होऊन वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यानचा वाद कायमस्वरुपी मिटण्याचे कामी मदत होणार आहे. वादी हे मोजणी फी भरण्यास तसेच कमीशनर यांची फि भरण्यास तयार आहेत. त्यामुळे त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

६. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे निशाणी २७ खाली दाखल करुन वादींच्या अर्जास आक्षेप घेतला आहे की, वादींचा अर्ज खरा नाही. वादींचा अर्ज कायदेशीर नाही. वादींनी अर्जात केलेले कथन खरे नाही व दाव्याचे स्वरुप पाहता त्यांना सदरचा अर्ज देता येणार नाही. वादींना दाव्यात पुरावा तयार करण्याकरिता कोर्ट कमिशन मागता येणार नाही, कारण वादींचा दावा हा मनाई हुकुमाकरिता असल्याने सदरच्या दाव्यात मोजणीचे कारण नाही. वादींनी यापुर्वी देखील याच न्यायालयात रे.मु.नं.२०५/२००२ चा दावा दाखल केलेला होता व त्यात देखील मोजणी होऊन याच तक्रार घेतलेल्या होत्या. त्या दाव्याचा व त्या वरील मा.जिल्हा न्यायालयातील अपीलाचा गुणदोषावर निकाल होऊन वादींच्या तक्रारी फेटाळण्यात आलेल्या आहेत त्यामुळे त्याच तक्रारी घेऊन पुन्हा वादींना नवीन दावा दाखल करता येणार नाही व पुन्हा कोर्ट कमिशनची मागणी करता येणार नाही. सबब वरील कारणास्तव वादींचा कोर्ट कमिशनाचा अर्ज

रद्द करण्यात यावा हि विनंती त्यांनी केली आहे.

७. दाव्याचे व दाव्यासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही विद्वान विधीज्ञांनी त्यांच्या अर्जातील व लेखी म्हणण्यातील कथनांचा पुनःउच्चार केला. वादीच्या विद्वान विधीज्ञांनी त्यांच्या युक्तिवादाचा पुष्ठयर्थ मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या **शांताराम दत्तात्रय केकान व इ. वि.भाऊसाहेब कारभारी केकान व इ. [2023 (2) Mh.L.J 78]** या निवाडयाचा आधार घेतला आहे. या उलट प्रतिवादीच्या विद्वान विधीज्ञांनी त्यांच्या युक्तिवादाचा पुष्ठयर्थ मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या **ज्ञानदेव विठ्ठल सालके व इ. वि. दगडु केदार इनामदार [2017(3) Mh.L.J. 314]** या निवाडयाचा आधार घेतला आहे.

८. प्रस्तुतचा दावा हा वादींनी प्रतिवादींविरुध्द जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकुम मिळण्याकामी दाखल केलेला आहे. वादींच्या कथनानुसार ते दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहे. वादींनी त्यांची मालकी व कब्जा दर्शविण्याकरीता गट क्र.५ च्या ७/१२ उता–याची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता वादी क्र.१ व २ यांच्या नावे सदर गटात एकत्रीत रित्या ०हे.७२आर क्षेत्र असल्याचे दिसुन येते. वादीने दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र.२०५/२००२ व नियमित दिवाणी अपील क्र.१३०/२०१३ च्या निकाल पत्रांचे अवलोकन केले असता दावा मिळकतीबाबत यापुर्वी देखील वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावे झाल्याचे दिसुन येते.

९. न्यायालयीन आयुक्ताच्या नेमणुकीबाबतचा मुख्य उद्देश हा दावा मिळकतीची वस्तुस्थिती अभिलेखावर येणे व दावा मिळकतीच्या क्षेत्रात अतिक्रमण झाले आहे किंवा नाही तसेच अतिक्रमण झाले असल्यास ते कोणी व किती क्षेत्रावर केले आहे हे न्यायालयासमोर यावे हा असतो. प्रस्तुतच्या दाव्याचे अवलोकन केले असता वादीने दावा मिळकतीवर त्यांचा कब्जा असल्याचे नमुद केले आहे. तसेच प्रतिवादींनी कुठेही वादींच्या क्षेत्रावर अतिक्रमण केले असल्याचे वादींचे कथन नाही. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी हे गैरकायदेशीर नोंदीचा गैरफायदा घेऊन त्यांच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करु पाहत आहे. परंतु वादींनी त्यांच्या दाव्यात नमुद केले आहे की यापुर्वीच दिनांक २८/०१/२००२ रोजी दावा मिळकतीची मोजणी होऊन दावा मिळकतीच्या हद्दी खुणा निश्चित झाल्या आहेत. त्यामुळे पुन्हा दावा मिळकतीची

मोजणी का करावी याचे कुठलेही ठोस कारण अर्जात दिसुन येत नाही.

१०. दावा हा जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. दाव्यामध्ये अद्याप वादींनी पुरावा दिलेला नाही. वादी व प्रतिवादी यांच्या दोन्ही विद्वान विधीज्ञांनी वर नमुद दाखल केलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या निवाडयांमध्ये मा.उच्च न्यायालयाने असे निदर्शीत केले आहे की, मनाई हुकुमाच्या दाव्यामध्ये वादींचा पुरावा पटलावर येण्यापुर्वी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक पुरावा गोळा करण्याकरीता मोजणी कामी करता येणार नाही. प्रस्तुतच्या दाव्याचे व अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता वादींच्या कथनानुसार दावा मिळकतीचे निश्चित अवलोकन होण्याकरीता मोजणी होणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. त्यामुळे वादींना त्यांची दावा मिळकत नेमकी कुठे आहे याचे अवलोकन झाल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादींना पुरावा गोळा करण्यास मदत होईल. परंतु, कायदयाचे हे गृहीत तत्व आहे की, न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक पुरावे गोळा करण्याकरता करता येणार नाही. त्यामुळे वादींनी त्यांची केस सर्वप्रथम योग्य त्या पुराव्यानिशी न्यायालयात मांडणे क्रमप्राप्त आहे. त्या कामासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करणे योग्य व न्यायोचित ठरणार नाही. त्यामुळे दाव्याचे स्वरुप व दाव्यातील कथनांचा विचार करता या स्टेजला वादींचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वादींचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

KANAKDANDE SHRIHARI

Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2026.02.09 16:30:30 +0530

**(एस.आर.कनकदंडे)**

दिनांक.०९.०२.२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश, पारनेर.